# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पाटण विधानसभा मतदारक्षेत्रातील कोयना धरणग्रस्तांना नागरी सुविधा मिळत नसल्याबाबत**

**(१) ३६९१९ (१६-०१-२०१६) श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण विधानसभा मतदारक्षेत्रामध्ये महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी कोयना धरण असून या धरणामुळे या विभागातील अनेक गांवाचे पुनर्वसन झाले आहे त्यातील बहूतांशी गांवाचे मतदारसंघातच पुनर्वसन झाले आहे परंतू मतदारसंघात पुनर्वसन झालेल्या या गावांना येथील बाधित धरणग्रस्तांना अद्यावत सुविधा मिळत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोयना धरणामुळे बाधित झालेल्या सर्व गांवाना अद्यावत पुनर्वसनासह १८ नागरी सुविधा देण्याचे राज्य शासनाने मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाटण विधानसभा मतदारसंघातील कोयना धरणग्रस्त बाधितांना त्यांच्या पुनर्वसीत गांवामध्ये सर्व सुविधा तसेच राज्य शासनाने ठरवून दिलेल्या १८ नागरी सुविधा अद्यापही मिळत नाहीत, यासंदर्भात राज्य शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, पाटण विधानसभा मतदारसंघातील कोयना पुनर्वसनग्रस्त गांवाना राज्य शासनाने ठरवून दिलेल्या १८ नागरी सुविधा देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०१-२०१९) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १०(२) मधील तरतूदीनुसार पुनर्वसित गावठाणामध्ये १८ नागरी सुविधा देय असून त्यानूसार सन १९७६ पुर्वीच्या प्रकल्पांनी बाधित झालेल्या पुनर्वसित गावठाण्यामध्ये नमूद सुविधा पुरविण्यात येतात.

(३) व (४) हे खरे नाही. पाटण तालुक्यातील कोयना प्रकल्पाने बाधित ५४ पुनर्वसित गावठाणे असून, सदर गावठाणांमध्ये देय सुविधांपैकी ३२१ नागरी सुविधा पुर्ण झाल्या असून २७ नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत. देय असलेल्या उर्वरित नागरी सुविधा संबंधितांना उपलब्ध करुन देण्यासाठीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बीड जिल्हयातील पारधी समाजातील नागरीकांच्या समस्यांबाबत

**(२) ४२७४२ (२८-४-२०१६) श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील पारधी समाजातील नागरीकांचे दुष्काळी परिस्थितीमुळे जीवन जगणे असह्य झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पारधी समाजातील नागरीकांची अन्न- पाण्यावाचून होत असलेली गैरसोय, उपासमारी दूर करण्याकरिता शासन आवश्यक कार्यवाही करणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०१-२०१९) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भावत नाही.

---

### मौजे खतगाव (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील शेतजमीन कायमस्वरुपी बाधित झाल्याबाबत

**(३) ४५९९४ (२८-०४-२०१६) श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील मन्याड नदीचा प्रवाह / पात्र अतिवृष्टीमुळे बदलून मौजे खतगाव, ता. बिलोली येथील गट नं.१०६ व गट नं.१०७ मधील शेतजमीन कायमस्वरुपी बाधित झाल्याप्रकरणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी तशा प्रकारचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने दिनांक ५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडून मागविण्यात आलेल्या अहवालावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०१-२०१९) :** (१) व (२) होय,

नांदेड जिल्हयातील मन्याड नदीचा प्रवाह / पात्र अतिवृष्टीमुळे बदलून मौजे खतगाव, ता.बिलोली येथील गट नं.१०६ व गट नं.१०७ मधील शेतजमिन वाहून गेल्यामुळे झालेल्या नुकसानीबाबत शासन निर्णय दिनांक १३ मे, २०१५ मधील तरतूदीनुसार पात्र असलेल्या श्री. करुणाबाई दादाराव वर्णे यांना दिनांक ५ ऑक्टोंबर २०१८ च्या शासननिर्णयानुसार मदत देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भावत नाही.

---

**जालना जिल्ह्यात महिंद्र ग्रामीण गृहकर्ज कंपनीकडून दुष्काळी परिस्थीतीत सुरु असलेल्या सक्तीच्या गृहकर्ज वसूलीबाबत**

**(४) ४८४४३ (२७-०४-२०१६) श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात महिंद्र ग्रामीण गृहकर्ज कंपनीकडून ग्रामीण भागात शेतकऱ्यांना वाटप केलेल्या गृहकर्जाची शेतकऱ्यांकडून दुष्काळी परिस्थतीत सुरु असलेली सक्तीची वसूली थांबविण्याची मागणी कर्जदार शेतकऱ्यांनी दिनांक २० डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दिलेल्या निवेदनात दुष्काळी परिस्थतीत सक्तीची गृहकर्ज वसूली न थांबविल्यास आत्महत्या करण्याचा इशारा निवेदनाव्दारे शेतकऱ्यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्तप्रकरणात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भ‍ावत नाही.

---

**मराठवाड्यातील जालना, औरंगाबाद व परभणी जिल्ह्यातून मुंबई, नवीमुंबई तसेच ठाणे येथे मोठया प्रमाणात दुष्काळग्रस्त कुटुंबे आल्याबाबत**

**(५) ५६४७८ (२२-०८-२०१६) श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील जालना, औरंगाबाद व परभणी जिल्ह्यातून मुंबई, नवीमुंबई तसेच ठाणे येथे मोठया प्रमाणात दुष्काळग्रस्त कुटुंबे आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर दुष्काळग्रस्तांना रोजगार, अन्नधान्य व निवारा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नरसीफाटा (जि.नांदेड) येथे दुष्काळ निवारण करण्यासाठी योजना आखण्याबाबत

**(६) ६१०२९ (२२-०८-२०१६) श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरसीफाटा (जि.नांदेड) येथे मागील ३ वर्षापासून प्रचंड दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून पिण्याला पाणी, जनावरांना कडबा व हाताला काम नसल्याने दैनंदिन व्यवहार भागविणे कठीण होत असल्याने रोजगाराच्या शोधात येथील नागरिक पुणे, मुंबईत स्थलांतर करीत असल्याचे वास्तव दिनांक २८ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नरसीफाटा येथे शासनाने दुष्काळ निवारण करण्यासाठी योजना आखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### उस्मानाबाद जिल्ह्यातून जाणाऱ्या सोलापूर ते जळगाव रेल्वे मार्गाबाबत

**(७) ८७९२९ (०४-०९-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातून जाणाऱ्या सोलापूर ते जळगाव रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण झालेले असून ते काम अद्याप मार्गी लागलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, हा रेल्वे मार्ग झाला तर महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी वास्तव्य असलेले तुळजापूर रेल्वेच्या नकाशावर येणार आहे, त्याचबरोबर मराठवाड्यातील अनेक गावे रेल्वेने जोडली जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्ह्यातील प्रवाश्यांची मागणी तसेच उस्मानाबाद सारख्या मागासलेल्या जिल्ह्यासाठी विकासाची गंगा म्हणून अपेक्षित असलेल्या या रेल्वे मार्गासाठी शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०१-२०१९) :** (१) (२) (३) व (४)

केंद्र शासनाच्या मध्य रेल्वेकडून घेतलेल्या माहितीनुसार सोलापूर - जळगाव (४५२.८ कि.मी.) या नवीन रेल्वे मार्गाची प्रकल्प किंमत रु.३२३७.९७ कोटी असून त्याचा परतावा दर -५.६९ इतका आहे. सदर प्रकल्पाचा सर्व्हे रेल्वे बोर्डाकडे सादर केला असून रेल्वे बोर्डाने सदर प्रकल्प राखून ठेवला आहे.

तसेच सोलापूर-जळगाव (४५२.८ कि.मी.) रेल्वेचाच एक भाग असलेला सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद (८० कि.मी.) या रेल्वे मार्गाचा सर्व्हे दिनांक ९/१०/२०१७ रोजी रेल्वे बोर्डाकडे सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**के-हाळा (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) परिसरातील गावांत कपाशी पिकावर बोंड आळीचा प्रार्दुभाव होवून शेतक-यांचे झालेले नुकसान**

**(८) ८८८४४ (१५-०८-२०१७) श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) के-हाळा (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) परिसरातील गावांत कपाशी पिकावर बोंड आळीचा प्रार्दुभाव होवून पिक वाया जाऊन शेतक-यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१९) :**(१) सदर बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) औरंगाबाद जिल्ह्यात सन २०१७ च्या खरीप हंगामामध्ये विदर्भात बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे कापूस पिकाचे व तुडतुडे रोगाच्या प्रादुर्भावामुळे धान पिकाचे झालेल्या नुकसानीसाठी शासन निर्णय दिनांक ०९.०५.२०१८, दिनांक १२.०७.२०१८ व दिनांक २४.१०.२०१८ अन्वये बाधितांना मदत म्हणून एकूण रु. २८६०३.९८लक्ष एवढा निधी वितरित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कृषी महाविद्यालयांचा दर्जा खालावत असल्याबाबत**

**(९) ९०१५९ (१५-०८-२०१७) ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने (एमसीईएआर) राज्यातील खासगी कृषी महाविद्यालयांची तपासणी करण्यासाठी त्रयस्त समिती नेमली असून या तपासणीमध्ये राज्यातील २० कृषी महाविद्यालये ' ड ' श्रेणीत आढळली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाविद्यालयाच्या व्यवस्थापनांनी आवश्यक निकषांची पूर्तता न केल्यास विद्यार्थ्यांना प्रवेश बंदची कारवाई केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी वसतिगृह तसेच वाचनालय, प्रयोगशाळा, विद्यार्थ्यांसाठी लागणारे जमीन फॉर्म नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेकडो विद्यार्थी या कृषी महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असून त्यातील अनुसूचित जाती, जमाती व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासन शुल्क भरत असतानाही महाविद्यालये विद्यार्थ्यांना सुविधा देत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर कृषी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना लागणाऱ्या सुविधांची पूर्तता करून महाविद्यालयांचा दर्जा वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०१-२०१९) :** (१) होय, राज्यातील १८ महाविद्यालये ' ड ' श्रेणीत आढळली आहेत.
(२) होय.
(३) होय.
(४) होय.
(५) महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील कलम ४० ते ४४ अनुसार महाविद्यालयासाठी संस्थाना संलग्नता देणे, संलग्नता काढणे, मान्यता काढणे इ. बाबीविषयीचे अधिकार कृषी विद्यापीठांना प्रदान केलेले आहेत. सदर महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना लागणाऱ्या सोयीसुविधांची पूर्तता त्वरित करण्यासाठी कृषी विद्यापीठांतर्गत नोटिसा देण्यात आल्या आहेत. तसेच या वर्षाची प्रवेश प्रक्रियेच्या स्थगितीची कार्यवाही कृषी विद्यापीठांनी केलेली आहे व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही विद्यापीठ स्तरावर करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वासनी (जि. अमरावती ) मध्यम प्रकल्पांतर्गत बाधित होणा-या बोरगाव पेठ (ता. अचलपूर ) या गावाचे पुर्नवसन करण्याबाबत**

**(१०) ९३९०९ (१६-०८-२०१७) श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वासनी (जि.अमरावती) मध्यम प्रकल्पांतर्गत बाधित होणा-या बोरगाव पेठ (ता. अचलपूर) या गावाचे पुर्नवसन करण्यात यावे अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा. मदत व पुर्नवसन मंत्री यांचेकडे माहे मार्च २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संबंधीचा अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेश मा. मदत व पुर्नवसन मंत्री यांनी दिनांक १८ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापपर्यंतही या प्रकरणीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०१-२०१९)** :(१), (२) (३) व (४) होय. सदर निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडुन अहवाल मागविण्यात आला असुन कार्यवाही सुरू आहे.

---

**राज्यात कृषी विभागांतर्गत सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(११) ९५३९३ (२७-१२-२०१७) श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कृषी विभागांतर्गत विविध योजनांसाठी सन २००४ पासून कार्यरत असलेल्या साडेपाच हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा बंद करण्यात आल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे माहे ऑगस्ट २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सदर सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ,पुणे यांच्या आस्थापनेवर जिल्हा,तालुका व मंडळ स्तरावर एकुण ४८७ कंत्राटी पदे मंजूर आहेत.सन २०१७-१८ मध्ये सदर कंत्राटी कर्मचा-यांना वेतन अदा करण्यासाठी पुरेशी तरतुद शिल्लक नसल्याने वरील कंत्राटी कर्मचा-यांपैकी १४३ कंत्राटी क्षेत्र सल्लागारांची पदे दिनांक २५/८/२०१७ पासून कमी करण्यात आली. सदर मंडळाचे नियोजीत कामकाज उपलब्ध क्षेत्रीय यंत्रणेमार्फत करण्यात येत आहे.भविष्यात कामाची व्याप्ती वाढल्यास कामाच्या आवश्यकतेनूसार पुन्हा कंत्राटी सेवा घेणे शक्य होईल.

वर नमूद कंत्राटी सेवेतून कमी करण्यात आलेल्या क्षेत्र सल्लागार यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या रिट याचिका अनुक्रमे क्र.१०८५३/२०१७ व २५४१०/२०१७ दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ च्या निकालान्वये खारीज केल्या आहेत.

(२) होय.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक, धुळे, जळगांव, नंदूरबार या जिल्हयासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना कांदा चाळ उभारणीसाठी खर्च केलेल्या निधीबाबत**

**(१२) ९८३७१ (२७-१२-२०१७) श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत शेतक-यांना कांदा चाळ उभारणीसाठीच्या नाशिक विभागातील नाशिक, धुळे, जळगांव, नंदूरबार या जिल्हयासाठी सन २०१६-१७ या वर्षासाठी सुमारे २९ कोटी ९३ लाख रुपयांपैकी केवळ सुमारे २१ कोटी ३६ लाख इतका निधी खर्च करण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित आठ कोटी रुपयांचा निधी खर्च न केल्याने चालू वर्षासाठी सदर निधी २९ कोटीचा ऐवजी केवळ १७ कोटी रुपये मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उर्वरित आठ कोटी रुपयांचा निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही, तथापि राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत शेतकऱ्यांना कांदा चाळ उभारणीसाठी सन २०१६-१७ मध्ये नाशिक विभागातील नाशिक, धुळे, जळगांव व नंदूरबार या जिल्ह्यांसाठी प्रत्यक्षात रु. १८७९.४५ लाख एवढा आर्थिक लक्षांक मंजूर करण्यात आला. तथापि, सन २०१४-१५ मध्ये नाशिक जिल्ह्यातील कांदाचाळ उभारणीकरिता दिलेल्या रुपये १११४.०० लाख रक्कमेचा त्यामध्ये समावेश असल्यामुळे नाशिक विभागातील नाशिक, धुळे, जळगांव व नंदूरबार या जिल्ह्यासाठी सन २०१६-१७ या वर्षासाठी लक्षांक हा रुपये २९९३.४५ लाख एवढा दिसून येतो.

तसेच सन २०१७-१८ मध्ये देखील सन २०१६-१७ मध्ये मंजूर केलेल्या लक्षांकाएवढा म्हणजे रुपये १७९३.७५ लाख एवढा लक्षांक मंजूर करण्यात आला आहे.
(३) निधी खर्च न होण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत..
(अ) आदिवासी बहुल कांदा उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक क्षमता नसल्याने आदिवासी भागातील लाभार्थींनी पूर्वसंमती घेऊनही कांदाचाळ उभारणी केली नाही. तसेच या भागातील लाभार्थींचा उत्पादित माल त्वरित विक्री करुन गरज भागवण्याकडे कल असल्याने कांदाचाळ उभारणीकरिता प्रतिसाद मिळत नाही.
(ब) सन २०१६-१७ मध्ये नाशिक जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे आर्थिक अडचणीत असलेले शेतकरी तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्ज पुरवठा न झाल्याने कांदाचाळ उभारणीची इच्छा असूनही मर्यादीत वेळेत पूर्वसंमती दिलेले शेतकरी कांदाचाळ बांधू शकले नाहीत.

(क) कांदाचाळ उभारणीकरिता प्रति मे. टन साधारण ८ ते ९ हजार रुपये खर्च येतो, मात्र अनुदान प्रति मे.टन ३५०० रु. एवढेच मिळते. कांदाचाळ उभारणीसाठी स्वत:चे जास्त भांडवल गुंतवावे लागत असल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांचा योग्य प्रतिसाद मिळत नाही.
(ड) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अल्प बाजारभावामुळे कांदा उत्पादन करुनही उत्पादन खर्चाएवढे आर्थिक उत्पन्न न झाल्याने कांदाचाळ उभारणी करु शकले नाहीत.

वरील कारणांमुळे सन २०१६-१७ मध्ये कांदाचाळ उभारणीकरिता निधी कमी खर्च झाला आहे.

---

**विदर्भातील प्रमुख खरीप पिक असलेले सोयाबीन उत्पादनात कमी पावसामुळे घट झाल्याबाबत**

**(१३) १०१०८१ (२९-१२-२०१७) श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील प्रमुख खरीप पिके असलेले सोयाबीनच्या कमी पावसामुळे उत्पादनात घट झाल्याचे माहे आक्टोंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती पंचनामे करुन शेतक-यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१९) :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.
(२) व (३)
प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार उत्पन्नात घट आल्यामुळे झालेले नुकसान हंगामाच्या शेवटी अधिसूचित क्षेत्र घटकनिहाय सरासरी उत्पन्न व उंबरठा उत्पन्न यांचे आधारे निश्चित केले जाते.
प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप,२०१७ मध्ये विदर्भातील १० जिल्ह्यांमधील ३.११ लाख शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकासाठी योजनेत सहभाग घेतला होता. त्यापैकी १.९५ लाख शेतकऱ्यांना रक्कम रु.२४६.८९ कोटी नुकसान भरपाई विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

### अकोला जिल्हयातील डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील प्रकल्पग्रस्तांना ५० टक्के आरक्षणानुसार सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१४) १०१४५३ (२७-१२-२०१७) श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील एकूण प्रकल्पग्रस्तांपैकी उर्वरीत प्रकल्पग्रस्तांना औरंगाबाद खंडपिठाच्या निर्णयाच्या आधारावर ५० टक्के आरक्षणानुसार सेवेत सामावून घेण्यासंदर्भात मा. कृषीमंत्री ह्यांना दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने ५० टक्के आरक्षणावर प्रकल्पग्रस्तांना सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-१-२०१९) :** (१) निवेदन प्राप्त नाही.

(२) व (३) महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तींचे पुनवर्सन अधिनियम,१९९९ व सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अे, दिनांक २१/१/१९८० नुसार, प्रकल्पग्रस्तांची पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

### पश्चिम विदर्भातील जिल्हयामध्ये हजारो कापूस उत्पादक शेतक-यांचे गुलाबी बोंडअळीमुळे झालेले नुकसान

**(१५) १०४७९८ (०१-०४-२०१८) श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट),**

**श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.संजय धोटे (राजूरा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.किशोर पाटील (पाचोरा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भातील जिल्हयामध्ये हजारो शेतक-यांच्या कपाशीवर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव झाल्याने कापूस उत्पादक शेतक-यांचे मोठे नुकसान झाले, हे खरे आहे,

(२) असल्यास, सदरील प्रकरणी स्थानिक प्रशासनाने उपरोक्त सर्व गावातील नुकसान झालेल्या शेतक-यांचे सर्वे करण्याचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रकरणी सर्वे करण्यात आला काय,

(४) असल्यास, सर्वेच्या अनुषंगाने कोणताही शेतकरी वंचित राहू नये याची दक्षता घेऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१९) :**(१) (२) व (३) होय.

(४) सन २०१७ च्या खरीप हंगामामध्ये विदर्भात बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे कापूस पिकाचे व तुडतुडे रोगाच्या प्रादुर्भावामुळे धान पिकाचे झालेल्या नुकसानीसाठी शासन निर्णय दिनांक ०९.०५.२०१८, दिनांक २५.०५.२०१८, दिनांक १२.०७.२०१८, दिनांक ३०.०८.२०१८, दिनांक ०१.१०.२०१८ व दिनांक ०१.११.२०१८ अन्वये विदर्भातील बाधितांना मदत म्हणून एकूण रु. १,३५,४७०.०५ लक्ष एवढा निधी वितरित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### गोशाला व पांजर पोल बांधण्यासाठी खाजगी संस्थांना गुरचरण भूमी देण्याबाबत

**(१६) १११६३५ (०१-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंश हत्या बंदी नंतर मोकाट गुरांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात उद्‌भवला असून त्यांच्या व्यवस्थेसाठी गोशाला व पांजर पोल बांधण्यासाठी खाजगी संस्थांना गुरचरण भूमी देण्यात यावी अशी मागणी संबंधित संस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या परिपत्रकानुसार सार्वजनिक सुविधा व सार्वजनिक प्रयोजन अशा साठीच गुरचरणभूमी देण्यात यावी अशी अट टाकण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदर अट काढून टाकून शासनाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन येथील मोकाट गुराची व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१७-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ च्या कलम २२ नंतर कलम २२ अ नव्याने समाविष्ट केले असून त्यानुसार केंद्र राज्य शासनास किंवा केंद्र राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही वैधानिक प्राधिकरणास एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी अथवा सार्वजनिक प्रकल्पासाठी जर इतर कोणताही शासकीय भूखंड उपलब्ध नसेल तर अशावेळी “गायरान जमीन” अशा सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा सार्वजनिक प्रकल्पांसाठी परिवर्तित करता येते अथवा पट्ट्याने देता येते.

तसेच सार्वजनिक प्राधिकरण वगळता इतर अन्य प्रकल्प प्रवर्तकास एखाद्या प्रकल्पासाठी गायरान जमीन अपरिहार्यपणे आवश्यक असल्यास अशा प्रकल्प प्रवर्तकाने आवश्यक गायरान जमिनीच्या क्षेत्राच्या दुप्पट क्षेत्र तसेच या क्षेत्राचे आशाप्रकारे नियत करण्यात येणाऱ्या गायरान जमिनीच्या मुल्यापेक्षा कमी असणार नाही इतके क्षेत्र त्याच महसूली गावात उपलब्ध करून दिल्यास अशा प्रकल्प प्रवर्तकास सुध्दा गायरान जमीन परिवर्तीत करता येते अथवा पट्ट्याने देता येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) सदर अट काढण्यात आलेली नाही. तथापि, पैदासीसाठी व शेतीकामासाठी उपयुक्त नसलेल्या पशुधनाचा सांभाळ करणाऱ्या गोशाळांच्या बळकटीकरणासाठी गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजनेअंतर्गत राज्यातील ३४ जिल्ह्यांकरीता प्रत्येकी रू.१.०० कोटी अनुदान देण्याचा निर्णय दिनाक २६.४.२०१७ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### औरंगाबाद येथे शेतक-यांसाठी असलेल्या विविध योजनांसंबंधी बनावट कागदपत्रे तयार करुन पाच कोटी रुपयांचा केलेला अपहार

**(१७) १११७१५ (०४-०४-२०१८) श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे शेतक-यांसाठी असलेल्या विविध योजनांसबंधी बनावट कागदपत्रे तयार करुन तब्बल पाच कोटी रुपयांचा अपहार करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सबंधित अधिका-यांच्या बनावट सहया करुन आणि बँक अधिका-यांशी संगनमत करुन ६६ लाखांचा अपहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती यास जबाबदार असणा-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१९) :**(१) होय. प्रकल्प संचालक (आत्मा), औरंगाबाद व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद या कार्यालयातील सुमारे रु.५.४३ कोटी इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे जुलै, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे.

(२) श्री.सुनिल गहेनाजी जाधव, तत्कालीन वरिष्ठ लिपीक,जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्याविरुध्द उस्मानपुरा पोलीस स्टेशन, औरंगाबाद येथे एफ.आय.आर. दाखल करताना प्रथमदर्शनी बनावट सहया करुन व बँक अधिकाऱ्यांशी संगनमत करुन रु. ६६.१९ लाख इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले होते.

(३) प्रकल्प संचालक (आत्मा), जालना व उपसंचालक (आत्मा), सामेती, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली पथक-१ व पथक-२ स्थापन करुन याप्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीत एकूण रु. ५,४३,५७,८८२/- इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले आहे.

(४) प्रथमदर्शी श्री. सुनिल गहेनाजी जाधव हे दोषी आढळून आल्यामुळे त्यांना विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद यांनी दि.२९.७.२०१७ च्या आदेशान्वये निलंबित केले असून त्यांच्याविरुध्द उस्मानपुरा पोलीस स्टेशन, औरंगाबाद येथे दि.०८.०८.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा पुढील तपासासाठी आर्थिक गुन्हे शाखा, औरंगाबाद शहर यांच्याकडे वर्ग करण्यात आला असून श्री.जाधव व बँक ऑफ महाराष्ट्र, औरंगाबाद येथील ५ कर्मचा-यांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. प्रस्तुत प्रकणातील जबाबदार दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदींनुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे. या अनियमिततेमध्ये बँक व्यवस्थापनाचा सहभाग तपासण्याबाबत प्रकल्प संचालक (आत्मा), औरंगाबाद यांनी प्रबंधक, बँक ऑफ महाराष्ट्र, झोनल कार्यालय, औरंगाबाद यांना कळविले असून त्याबाबत बँकेच्या मुख्य प्रबंधकामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिडको, जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना विनाअट प्रकल्पग्रस्त म्हणून दाखले मिळण्याबाबत**

**(१८) ११२६९२ (१२-०४-२०१८) श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको, जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना विनाअट प्रकल्पग्रस्त म्हणून दाखले मिळावेत आणि इतर विविध मागण्यांसाठी डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया संघटनेच्यावतीने सिडको द्रोणगिरी नोडमधील उरण मेट्रो सेंटरच्या कार्यालयासमोर दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०१-२०१९) :** (१) होय.

(२) आंदोलन कर्त्यांची प्रमुख मागणी बाधीत खातेदाराला व त्याच्या प्रत्येक वारसाच्या कुटूंबाला प्रकल्पग्रस्त दाखला मिळावा अशी आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१.०१.१९८० च्या शासन निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्त दाखले देण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**सांगली जिल्हयातील कृषी जिल्हापरिषदेतंर्गत येणा-या योजनापूर्ववत जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव.**

**(१९) ११४२३० (०१-०४-२०१८) श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील कृषी जिल्हापरिषदेतंर्गत येणा-या योजना राज्य शासनाकडे वर्ग करण्यात आल्यामुळे अनेक योजनांना खीळ बसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे ओह काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर योजना पूर्ववत जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याबाबतच्या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सांगली जिल्हयातील कृषी जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या योजना राज्य शासनाकडे वर्ग करण्यात आलेल्या नाहीत.

(२) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**राज्यात प्रकल्पबाधित व्यक्ती मार्फत बनावट आदेश तयार करून पुनर्वसनाच्या जमिनी बळकावण्याचे घडलेले प्रकार**

**(२०) ११५७७१ (०१-०४-२०१८) श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात प्रकल्पबाधित व्यक्ती मार्फत बनावट आदेश तयार करून पुनर्वसनाच्या जमिनी बळकावण्याचे प्रकार घडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजतागायत असे किती प्रकार निदर्शनास आले आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, बोगस वाटप आदेशांची कोणतीही शहानिशा न करता त्यांना अंमल देणारे अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०१-२०१९) :**

(१) व (२)

हे अशंत खरे आहे.

केवळ पुणे विभागातील सातारा,सांगली,सोलापूर व कोल्हापूर जिल्हयामध्ये सन २००८-०९ अशी एकूण ३४ प्रकरणे उघडकीस आली असून त्याबाबत मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे एकूण ३४ पुनर्विलोकन याचिका दाखल झाल्या आहेत व पुणे जिल्हयामध्ये असे एकूण २ प्रकार उघडकीस आले आहेत.

(३) व (४) सदर प्रकरणांमध्ये सकृतदर्शनी तथ्य आढळून आल्याने प्रस्तुतचे जमिनीबाबत जिल्हा पुनर्वसन कार्यालय,पुणे यांचे दि.५.१.२०१८ अन्वये आदेश रदद करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने ७/१२ अभिलेखामध्ये जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन (जमीन) पुणे यांचे नाव दाखल करण्यात आलेले असून सदर प्रकरणाची चौकशी चालू असून प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यात अतिवृष्टीमुळे व परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेली नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(२१) १२११७६ (२३-०७-२०१८) श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जून ते सप्टेंबर, २०१७ या कालावधीत अतिवृष्टीमुळे व माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान परतीच्या पावसामुळे झालेल्या शेती व फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करुन पिकांच्या नुकसानीचा अहवाल क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालाची छाननी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अहवालाच्या छाननीनुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१९) :** (१) व (२) होय.
(३) शासन निर्णय दिनांक १०.०७.२०१८ अन्वये, राज्यात एप्रिल ते ऑक्टोबर २०१७ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व अवेळी पावसामुळे शेतीपिकांच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी एकूण रु.११०,०९,००,७५० एवढा मदतनिधी मंजूर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

---

**औरंगाबाद येथील कृषि तांत्रिक व्यवस्थापन संस्थेच्या (आत्मा) कार्यालयात झालेला गैरव्यवहार**

**(२२) १२३४१६ (३१-०७-२०१८) श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)औरंगाबाद येथील कृषि तांत्रिक व्यवस्थापन संस्थेच्या आत्मा या कार्यालयात दिनांक २७ जून २०१२ ते ३० जून २०१७ या कालावधीत ५ कोटी ८३ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कार्यालयातील वरिष्ठ लिपिकांनी प्रकल्प संचालक कृषि जिल्हा अधिक्षक आदि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहया करून गैरव्यवहार केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची  कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१९) :**(१) होय. प्रकल्प संचालक (आत्मा), औरंगाबाद व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथे सुमारे रु.५.४३ कोटी इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे जुलै, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे.
(२) श्री.सुनिल गहेनाजी जाधव, तत्कालीन वरिष्ठ लिपीक,जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी बनावट सहया करुन व बँक अधिकाऱ्यांशी संगनमत करुन अपहार केल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे.
(३) प्रकल्प संचालक (आत्मा), जालना व उपसंचालक (आत्मा), सामेती, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली पथक-१ व पथक-२ स्थापन करुन याप्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीत एकूण रु. ५,४३,५७,८८२/- इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले

आहे. प्रथमदर्शी श्री. सुनिल गहेनाजी जाधव हे दोषी आढळून आल्यामुळे त्यांना विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद यांनी दि.२९.७.२०१७ च्या आदेशान्वये निलंबित केले असून त्यांच्याविरुध्द उस्मानपुरा पोलीस स्टेशन, औरंगाबाद येथे दि.०८.०८.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा पुढील तपासासाठी आर्थिक गुन्हे शाखा, औरंगाबाद शहर यांच्याकडे वर्ग करण्यात आला असून श्री.सुनिल जाधव व बँक ऑफ महाराष्ट्र, औरंगाबाद येथील ५ कर्मचा-यांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. प्रस्तुत प्रकणातील जबाबदार दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदींनुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे. या अनियमिततेमध्ये बँक व्यवस्थापनाचा सहभाग तपासण्याबाबत प्रकल्प संचालक (आत्मा), औरंगाबाद यांनी प्रबंधक, बँक ऑफ महाराष्ट्र, झोनल कार्यालय, औरंगाबाद यांना कळविले असून त्याबाबत बँकेच्या मुख्य प्रबंधकामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खासगी दुध संघ सरकारच्या निर्णयाना न जुमानता दुधाच्या किंमत निश्चित करून शेतकरी व ग्राहकांची लूट करीत असल्याबाबत**

**(२३) १२६७६१ (१५-१२-२०१८) श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण दुधापैकी ६० टक्के दुधाचे संकलन आणि खरेदी खाजगी संघ करीत असून उर्वरित ४० टक्के दुध सहकारी आणि सरकारी डेअऱ्यांमार्फत घेतले जाते, या मक्तेदारीच्या जोरावरच खासगी दुध संघ सरकारच्या निर्णयाला न जुमानता आपल्या मर्जीने दुधाचा पुरवठा कमी जास्त किंमत निश्चित करून शेतकरी व ग्राहकांचे नुकसान करीत असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने दिनांक २१ जुलै २०१८ रोजी वा त्यासुमारास दुधाला २२ रूपये १० पैसे देण्याचे जाहीर केले असताना खाजगी दुध संघांनी शासन आदेशाचे उल्लंघन करून कमी दर देण्याचे दरपत्रक दुध संकलन केंद्रांना दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार दुध दरवाढ लागु केलेल्या दरपत्रकाबाबत कोणती कार्यवाही करुन ग्राहकांची लूट करणाऱ्या संबंधित खाजगी दुध संघावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१७-०१-२०१९) :** (१) राज्यातील खाजगी दूध क्षेत्राच्या दूध खरेदी-विक्री दरावर शासनाचे कायदेशीररीत्या सद्यस्थितीत कोणतेही बंधन नाही. त्यामुळे खाजगी दूध क्षेत्र आपल्यास्तरावर दूधाचे खरेदी व विक्री दर निश्चित करीत असतात. मात्र शासनाने शासकीय दुधाकरिता निश्चित केलेले दूध खरेदीचे दर शासनाच्या दिनांक १० जुलै,२०१५ अन्वये निर्गमित केलेल्या शासन निदेशान्वये सहकारी क्षेत्राला बंधनकारक करण्यात आले आहे. तथापी सदर निदेशाविरुद्ध मा.उच्च न्यायालयामध्ये विविध याचिका दाखल झाल्या असून,सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(२) व (३) दूध उत्पादकांना त्याच्या दुधाला रास्तभाव मिळावा या उद्देशाने शासनाने दिनांक २०.०७.२०१८, ३१.०७.२०१८ व २१.०८.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये गाय दूध खरेदीसाठी ३.२% फॅट व ८.३% एस एन एफ गुणप्रतीच्या दुधाला रु. २२.१० प्रति लिटर दर निश्चित करुन त्यापुढील प्रति वाढीव फॅटसाठी ३० पैसे प्रति लि. आणि प्रति वाढीव एसएनएफ साठी रु. १/- वाढ देण्याचा निर्णय घेतला होता. या अनुदान योजनेत ज्या खाजगी व सहकारी दुग्ध प्रकल्पांनी आपला सहभाग नोंदविला होता केवळ अशाच दुग्ध प्रकल्पांना सदर अनुदान योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्यात आला होता. त्यामुळे राज्यातील ज्या दुग्ध प्रकल्पांनी शासनाच्या निर्णयाप्रमाणे दूध उत्पादकांना दुध खरेदी दर दिले नाहीत त्यांना सदर अनुदान योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ड्रोनद्वारे पिकांची पाहणी करण्याच्या प्रकल्पाबाबत**

**(२४) १२७२५१ (०६-१२-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ड्रोनद्वारे पिकांची पाहणी करण्याच्या प्रकल्पाबाबत बंगळूरूतील इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सशी शासन परस्पर सामंजस्य करार करणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पामुळे कृषी विभागाला खरीप आणि रब्बी पेरणीचा अचूक अंदाज येणार असून पिकावरील रोगाची ही अचूक माहिती मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प प्रत्यक्षात कार्यान्वीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०१-२०१९) :** (१), (२) व (३) कृषी विषयक स्थितीचा संपूर्ण पीक कालावधीत सर्व समावेशक मुल्यामापन आढावा वेळोवेळी घेवून त्याबाबतची माहिती निर्णय यंत्रेणाला कळविण्यासाठी तंत्रज्ञानावर आधारीत यंत्रणा विकसित करण्याचा प्रकल्प राबविण्याचे नियोजित आहे. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीची व्हयुरचना ठरविण्यासाठी आयुक्त (कृषी)

यांच्या अध्यक्षतेखाली टॉस्क फोर्स गठीत करण्यात आले आहे. सदर टॉस्क फोर्सकडून, राष्ट्रीय सुदूर उपयोजन केंद्र (NRSC) यांनी तयार केलेला Approach paper/Concept paper वर चर्चा करुन अंतिम करण्यात येणार आहे. सदर Approach paper/Concept paper च्या आधारे महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र यांच्याकडून सर्व संबंधिताच्या सल्यानुसार व आवश्यक असणारी माहिती गोळा करुन प्रथम टप्प्यात प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

४. प्रश्न उद्भ‍ावत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील अनेक गावांमध्ये एस.टी सुविधा नसल्याबाबत**

**(२५) १२७९८७ (१५-१२-२०१८) श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेसरफ, पळसंबे, अणदूर, मणदूर, मांडुकली, वेतवडे (ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर) या गावांत एस.टी सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी तीन ते चार किलोमीटर पायी प्रवास करून जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोल्हापूर जिल्हयातील म्हासुर्ली, कोते, चांदे या परिसरात एस टी सेवा सुरू नसल्यामुळे विद्यार्थी, व्यापारीसह ग्रामस्थांमध्ये असंतोषाची निर्माण झाला असुन भोगावती, कुरुकली महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या शंभर पेक्षा जास्त असताना विद्यार्थ्यांना एस टी सेवा सुरू नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू ठिकाणी एस.टी सेवा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-०१-२०१९) :** (१) वेसरफ, पळसंबे, अणदूर, मणदूर, मांडुकली, वेतवडे (ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर) ही गावे कोल्हापूर-गगनबावडा या मार्गावर आहेत. मुख्य मार्गापासून सदर गावांचे अंतर हे सरासरी १ ते २.५ कि.मी.इतके आहे. सदर गावांना जरी थेट सेवा नसेली तरी कोल्हापूर गगनबावडा मार्गावर चालनात ५० फे-या असून उपरोक्त गावातील विद्यार्थी प्रवासाचा लाभ घेत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

### विदर्भातील ठिंबक सिंचन योजनेचा लाभ शेतकऱ्यांना न मिळाल्याबाबत

**(२६) १२८०४१ (१५-१२-२०१८) श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागांतर्गत ठिंबक सिंचन योजनेसाठी शेतकऱ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागवण्यात आले असुन त्यात विदर्भ मागे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भात वारंवार सर्व्हर बंद पडत असल्यामुळे शेतकऱ्यांना निर्धारित कालावधीत अर्जच भरता आले नसल्यामुळे शेतकरी ठिबक सिंचन योजनेस उत्सुक असले तरी आर्थिक अडचणीमुळे त्यांना योजनेत सहभागी होता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्जास मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०१-२०१९) :** (१), (२) व (३) सन २०१७-१८ या वर्षात सुक्ष्म सिंचनासाठी अर्ज करण्यासाठी ऑनलाईन प्रणाली दि.१५ मार्च, २०१८ पर्यंत सुरु होती. त्या वर्षात विदर्भातील ११ जिल्हयांमधून १,३२,८१८ अर्ज प्राप्त झाले होते.

सन २०१८-१९ या वर्षात मार्च, २०१९ अखेरपर्यंत अर्ज स्विकारण्यात येणार आहेत. दि.१ जाने, २०१९ अखेर विदर्भातील ११ जिल्हयांमधून ४१,४४४ अर्ज प्राप्त झालेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### हिवराआश्रम (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे पीक विमा पोर्टलमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याबाबत

**(२७) १२८४१५ (३०-११-२०१८) डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवराआश्रम (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे खरीप हंगाम २०१८-१९ करिताच्या पीक विमा पोर्टलमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे आपले सरकार सेवा केंद्रावर शेतक-यांचे अर्ज स्विकारणे बंद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आपले सरकार सेवा केंद्रासोबतच बँकेतही पिक विमा स्विकारण्यात यावा अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने हिवराआश्रम येथील विमा पोर्टलमधील तांत्रिक अडचणी दूर करून बँकेतही पिक विमा स्विकारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०१-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
हिवराआश्रम (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथील खरीप हंगाम २०१८ मधील ३०३८ हेक्टर क्षेत्र आपले सरकार सेवा केंद्रामार्फत विमा संरक्षित करण्यात आले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०१८ मध्ये शेतकऱ्यांनी सहभागी होण्याची अंतीम मुदत दि.३१.०७.२०१८ अशी होती. शेतकऱ्यांनी सहभाग घेण्यासाठी जनसुविधा केंद्र, बँक व पीक विमा पोर्टलवर स्वत: ऑनलाईन अर्ज करणे या सुविधा होत्या. परंतु, सदर कालावधीमध्ये काही दिवस पीक विमा पोर्टलमध्ये काही तांत्रिक अडचणी आल्यामुळे शेतकऱ्यांना जनसुविधा केंद्रांमार्फत अर्ज करता आले नाहीत. या कालावधीमध्ये बँकांना शेतकऱ्यांचे अर्ज स्विकारणेबाबत सुध्दा सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार ९०७२ बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी बँकेमार्फत सहभाग घेतलेला आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

### नांदेड जिल्हयातील शेतक-यांच्या पीक विमाच्या अडचणी दूर करण्याबाबत

**(२८) १२८४६८ (१५-१२-२०१८) श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिह्यात प्रधानमंत्री पिक विमाची ऑनलाईन माहिती भरण्यासाठी शेतकऱ्यांची ई-सुविधा केंद्रावर गर्दी होत असुन वेबसाईट चालत नसल्याने ई-सुविधा केंद्र चालक शेतक-यांचे पैसे भरुन घेण्यास तयार नाहीत, तर ई-सुविधा केंद्र चालकांचे पैसे वेबसाईट बंद असल्यामुळे अडकून पडले असल्याने पीक विमाची तारीख घोषित झाल्यानंतर ऑनलाईन सातबारा निघत नाही व दिनांक १९ जुलै, २०१८ पर्यंत सातबाराचे पोर्टल बंदच असल्यामुळे शेतक-यांसाठी उपलब्ध असलेली सदर योजना अयशस्वी ठरत असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऑनलाईन सातबारा बंद असल्यामुळे शेतक-यांच्या तक्रारीनंतर ही सेवा सुरु झाली असुन ही सेवा नेहमी खंडीत होत असल्याने शेतक-यांना वेळेवर पीक विमाची ऑनलाईन माहिती भरता येत नसल्यामुळे सदर योजनेची मुदत वाढवुन देण्याची मागणी संबंधित शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नांदेड जिल्हयातील शेतक-यांच्या पीक विमाच्या समस्या दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०१८ मध्ये बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी सहभागी होण्याची अंतीम तारीख दि.२४.०७.२०१८ तर कर्जदार शेतकऱ्यांसाठी सदरची तारीख दि.३१.०७.२०१८ अशी होती. तथापि, बिगर कर्जदार शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी सदर मुदतीस दि.३१.०७.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

तसेच ई-फेर फार प्रकल्प अंमलबजावणीमध्ये सर्व्हर क्षमता व स्पेस ची अत्यंत कमतरता असल्यामुळे वेळोवेळी तांत्रिक बिघाड येत होते. म्हणून ७/१२ व ८-अ चा उतारा मिळण्यास शेतकऱ्यांना अडचणी येत होत्या त्याकरीता जिल्हाधिकारी, नांदेड यांनी दि.०९.०७.२०१८ च्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना ७/१२ व ८-अ चा उतारा उपलब्ध होणेबाबत सूचना दिल्या होत्या.

(४) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

## राज्यात पीक वीमा योजनेंतर्गत शेतक-यांच्या खात्यावरुन परस्पर विम्याची रक्कम घेतली जात असल्याबाबत.

**(२९) १२८५२६ (०४-१२-२०१८) श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पिक विमा योजनेंतर्गत कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना पीक विमा काढण्यासाठी अवाहन केले जात असून त्यामध्ये कर्जदार शेतक-यांकडून सक्तीने शेतक-यांच्या परवानगीशिवाय बँकांमधून संबंधित शेतक-यांच्या खात्यावरुन परस्पर विमाची रक्कम घेतली जात असल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षी उत्पादनात ५० टक्कयापेक्षा जास्त घट झालेल्या १५० शेतक-यांनी विमा संरक्षण मिळण्यासाठी अर्ज केले, त्यानुसार कृषी विभागाने पंचनामे करुन शेतकरी विमा संरक्षण मिळण्यास पात्र असल्याचा अहवाल देखील दिला, परंतु अद्यापपर्यंत एकाही पात्र शेतकऱ्यांला विमा संरक्षण मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पिक विमा योजनेच्या नावाखाली शेतक-यांची फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार, योजना कर्जदार शेतकऱ्यांना अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पीकांसाठी बंधनकारक असून, बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सदर योजना ऐच्छिक आहे.

(२) प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०१७ मधील स्थानिक नैसर्गिक आपत्तीमध्ये पंचनामे करुन नुकसान झालेल्या पात्र ६८ शेतकऱ्यांना रु.३,५८,७४४/- इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील अपघातग्रस्त कुटुबांला नुकसान भरपाई मिळणेबाबत**

**(३०) १२८६५० (११-१२-२०१८) श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील सौ.दुर्गाक्का या पारंपारिक लाडलक्ष्मीकार खेळ करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असुन दिनांक ७ सप्टेंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास पाटणेफाटा बस थाब्यावर उभ्या असताना एस.टी.महामंडळाच्या बसने त्यांना धडक दिल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यु झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या कुटुंबियांना तातडीची मदत म्हणून एस.टी.महामंडळाने ५० हजार रुपये दिले असून नुकसान भरपाई मिळण्यासाठी पी फार्म भरुन घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पी फॉर्म भरुनही त्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्यात आली नसल्यामुळे तेथील नागरीकांनी चंदगड तहसिल कार्यालयासमोर धरणे-आंदोलने सुरु केले असून त्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक १४ जुन, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.परिवहन मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अपघातात मृत्यु पडलेल्या सौ.दुर्गाक्का यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-०१-२०१९) :** (१) दि.०७.०९.२०१८ रोजी राज्य परिवहन महामंडळाच्या चंदगड आगाराची बस बेळगाव ते हेरे गुडवळे या मार्गावर धावत असताना, हलकर्णी फाटा येथे रस्त्यावरुन चालत जाणाऱ्या सौ.दुर्गाक्का नागाप्पा लाडलक्ष्मीकार ही महिला पाय घसरुन महामंडळाच्या बसच्या डाव्या बाजूच्या मागील चाकाखाली सापडून जखमी झाल्या व त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र, चंदगड येथे उपचारार्थ दाखल केले असता, त्यांना मयत घोषित करण्यात आले आहे.

(२) सदर मयत महिलेच्या वारसांना दि.०७.०९.२०१७ रोजी आर्थिक तात्कालिक मदत रु. १०,०००/- अदा करुन, त्यांना 'पी फॉर्म' देण्यात आलेला होता.

(३) सदर प्रकरणी सौ.दुर्गाक्का लाडलक्ष्मीकार यांचे कुटुंबियांना अपघात नुकसान भरपाई देण्याबाबत श्रीमती संध्यादेवी कुपेकर, आमदार यांचे दि.१२.०४.२०१८ रोजीचे निवेदन राज्य परिवहन महामंडळास प्राप्त झालेले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने राज्य परिवहन नियमानुसार अपघात नुकसान भरपाई अदा करणेबाबतच्या सूचना संबंधितानां देण्यात आलेल्या आहेत.

(४) सदर अपघातास राज्य परिवहन महामंडळाचा बसचालक जबाबदार नसून, मयत पादचारी महिला सौ.दुर्गाक्का लाडलक्ष्मीकार या जबाबदार असल्याने, विभाग नियंत्रक, कोल्हापूर विभाग, राज्य परिवहन महामंडळ यांचेकडून राज्य परिवहन नियमानुसार प्रवासेत्तर घटक (पादचारी, सायकलस्वार इ.) दोष नसण्याच्या तत्वावर मृत्यु प्रकरणी देय असलेली अपघात नुकसान भरपाई रक्कम रु ५०,०००/- त्यांना मंजूर करण्यात आलेली होती. परंतु सदरची रक्कम त्यांना मान्य नसल्याने मयताचे वारसांनी अपघात नुकसान भरपाईकरिता मोटार अपघात दावा प्राधिकरण, गडहिंग्लज येथे दावा क्र.१४/२०१८ दाखल करुन रु. २७,२५,०५२/- (सत्तावीस लाख पंचवीस हजार बावन्न) एवढ्या नुकसान भरपाईचा दावा दाखल केलेला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून न्यायालयात दावा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**मळवीवाडी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) या गावांच्या पुनर्वसनाबाबत**

**(३१) १२८६५५ (१०-१२-२०१८) श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मळवीवाडी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) ही वसाहत सन १९६० मध्ये जलप्रलयात बुडाली त्यानंतर शासनाने या गावचे पुनर्वसन उजाड माळ रानावर मळवीवाडी येथे केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावाची लोकसंख्या ६५० इतकी असून तेथील ग्रामस्थांनी त्यांच्या मागण्यांचे निवेदन दिनांक १३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास तहसिल कार्यालयावर मोर्चा काढून देवुन मा.पालकमंत्री यांचेकडे दिनांक १४ जून २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निवेदनाच्या अनुषगांने ग्रामस्थांनी दिलेल्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही, मळवीवाडी (ता. चंदगड, जि. कोल्हापूर) ही वसाहत जलप्रलयात बुडाली नसून, कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्ह्यामध्ये असणा-या राकसकोप धरणामुळे विस्थापित झाली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ग्रामस्थांच्या मागण्याच्या अनुषंगाने, अपर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी दि.११.०९.२०१८ रोजी ग्रामस्थांसोबत बैठक घेतली आहे. ग्रामस्थांनी केलेल्या मागण्या विविध विभागांशी संबंधित आहेत. ग्रामस्थांच्या मागणीसंदर्भात कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भ्ावत नाही.

---

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात या योजनेअंतर्गत मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्याच्या वारसांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(३२) १२८७५८ (०४-१२-२०१८) श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात या योजनेअंतर्गत विविध कारणांनी मृत्युमुखी पडलेल्या २०५ शेतकऱ्याच्या वारसांना नुकसान भरपाई देण्यात आली असुन ३४ शेतकऱ्यांच्या वारसांना नुकसान भरपाई देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबात शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांच्या वारसांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सन २०१७-१८ चा कालावधी दि.१ डिसेंबर, २०१७ ते दि.७ डिसेंबर, २०१८ असून या कालावधीत ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि. पुणे यांच्यामार्फत योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. सदर योजनेच्या माहे डिसेंबर, २०१८ अखेरच्या जायका विमा सल्लागार कंपनीच्या अहवालानुसार राज्यात विमा कंपनीकडे एकूण १७२३ प्रस्तावाबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्यापैकी २०१ विमा प्रस्तावांना मान्यता देण्यात आली असून ८ विमा प्रस्ताव नामंजूर केले आहेत. तर ७४८ विमा प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत होते व कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी ७६६ विमा प्रस्ताव प्रलंबित आहेत.

| विमा कंपनीकडे सूचना / नोंद संख्या | मंजूर प्रस्ताव | ना-मंजूर प्रस्ताव | विमा कंपनीकडे कार्यवाहीत प्रस्ताव | कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी प्रलंबित |
|---|---|---|---|---|
| १७२३ | २०१ | ८ | ७४८ | ७६६ |

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रस्ताव शिघ्र गतीने मंजूर होणेसाठी जिल्हास्तरावर तसेच आयुक्तालय स्तरावर विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीचे प्रतिनिधी यांच्या बैठका घेऊन सातत्याने प्रकरणे निकाली काढणेस्तव सूचना देण्यात आल्या आहेत तसेच त्याबाबत सातत्याने पाठपुरावा चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लिंपणगाव (ता.श्रीगोंदे, जि.अहमदनगर) परिसरातील मुंढेकरवाडी शिवारातील ऊस पिकांवर विविध किडी रोगांचा प्रादुर्भाव होवुन ऊस पिकाचे झालेले नुकसान**

**(३३) १२८७७१ (०४-१२-२०१८) श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लिंपणगाव (ता.श्रीगोंदे, जि.अहमदनगर) परिसरातील मुंढेकरवाडी शिवारातील ऊस पिकांवर विविध किडी रोगांचा प्रादुर्भाव होऊन ऊस पिकांचे नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०१-२०१९) :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.
(२) होय. श्रीगोंदा तालुक्यात ११५ गावांपैकी ११० गावामध्ये एकूण ७८८८ शेतकऱ्यांच्या शेतावर ५००० हे. क्षेत्रावरील ऊस पिकावर १५ ते २० टक्के या प्रमाणात हुमणीचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. मौजे लिंपणगांव येथील ११७ शेतकऱ्यांच्या १०४.२५ हे., मौजे मुंढेकरवाडी येथील १०७ शेतकऱ्यांच्या १०२ हे., मौजे जंगलेवाडी येथील ७८ शेतकऱ्यांच्या १०२ हे. अशा एकूण ३ गावांमध्ये ३०२ शेतकऱ्यांच्या ३०८.९५ हे. क्षेत्रावर हुमणी किडीचा प्रादुर्भाव आढळून आलेला आहे.
(३) ऊसाची लागवड झालेल्या गावामध्ये हुमणी किडीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी ८ शेतकरी मेळावे घेण्यात आले. २ शेतकरी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. ५५ शिवार फेरींचे आयोजन करण्यात आले. दैनिक वर्तमानपत्रातून ३ वेळा प्रसिध्दी देण्यात आली. गावांमध्ये पोस्टर्स लावण्यात आले. तसेच कृषि विद्यापीठ शास्त्रज्ञांच्या क्षेत्रिय भेटीचे आयोजन करुन मार्गदर्शन करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील पिकांवरील बोंडअळीचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत**

**(३४) १२८८९३ (१५-१२-२०१८) श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कापसाच्या बीटी बियाणात ९० दिवसांपर्यत बोंडअळीला रोखण्याची ताकद असतांना ५० ते ६० दिवसांचे पीक असतांना बोंडअळीचा प्रादुर्भात नांदेड जिल्हयात दिसून येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्हयात कोरडवाहू कापसाची लागवड जूनपर्यत झाली असुन कापूस पाते, फुल लागण्याच्या अवस्थेत असुन या सद्य:स्थितीमध्ये रसशोषण करणा-या किडीचा प्रादुर्भात आढळुन येत असुन जिनिंग मिलमध्ये गुलाबी बोंडअळीचे पतंग कामगंध सापळयांमध्ये सापडत असल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदेड, किनवट तालुक्यात ५० ते ६० टक्के कापसाला बोंडअळीची लागण झाल्याचे दिसून आले असुन शेजारील तेलंगणा, आंध्रपदेशातून आलेल्या बनावट बियाणांमुळे सदरहू स्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नांदेड जिल्हयातील पिकांवरील बोंडअळीचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०१-२०१९) :** (१), (२), (३) व (४)

नांदेड जिल्ह्यात कापसाचे सरासरी क्षेत्र ३,२३,७५४ हेक्टर असून चालू हंगामात कापसाची लागवड २,३९,८५३ हेक्टरवर झाली आहे व त्याची टक्केवारी ७४ टक्के आहे. माहे जुलै व ऑगस्ट मध्ये गुलाबी बोंड अळीला वातावरण अनुकूल झाल्यामुळे बोंड अळीचा प्रादुर्भाव दिसून आला तसेच, जिल्ह्यातील काही गावांमध्ये पिकावरील किड सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) नुसार त्याचे प्रमाण आर्थिक नुकसान पातळीच्या (इटीएल) वर दिसून आले. या अनुषंगाने सर्व क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी यांनी संपूर्ण जिल्ह्यामध्ये गावोगावी मोहिम राबवून बैठका, कार्यशाळा, प्रशिक्षणे, कृषि वार्ताफलक, क्षेत्रिय भेटी, आत्मा, कृषि विज्ञान केंद्र, कापूस संशोधन केंद्र इत्यादीद्वारे जनजागृती घडवून आणली. क्रॉपसॅप अंतर्गत प्रत्येक मंडळामध्ये एक गांव निवडून मास ट्रॅपिंग करण्याकरिता कामगंध सापळे लावण्यात आले होते. जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत गुलाबी बोंड अळी नियंत्रणात आहे. तसेच, किनवट तालुक्यात माहे एप्रिल,२०१८ मध्ये वा त्या दरम्यान परराज्यातून आलेल्या बोगस बी.टी. कापूस बियाणे विशेष पथकामार्फत तपासणी करून पकडण्यात आले व सदर दुकानदार व कंपनी यांचे विरूद्ध गुरनं.३२, दिनांक १५/०४/२०१८ अन्वये पोलीस स्टेशन सिंदखेड, ता.माहूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला व गुरनं.७७ दिनांक १९/०४/२०१८ अन्वये पोलीस स्टेशन किनवट, ता.किनवट येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भ‍ावत नाही.

**राज्यातील एसटी महामंडळाची यशस्वी ठरलेली प्रवासी वाढवा योजना बंद झाल्याबाबत**

**(३५) १२९००१ (११-१२-२०१८) श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एसटी महामंडळाची यशस्वी ठरलेली प्रवासी वाढवा ही योजना बंद करण्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवासी वाढवा योजनेच्या बक्षिसात वाढ करून आगाराला २५ हजाराहून १ लाख तसेच वाहक आणि चालकाला अनुक्रमे ५ हजार आणि ३ हजार रुपयाचे रोख पारितोषिक देण्याचा निर्णय दिनांक २१ डिसेंबर २०१६ रोजी वा त्यासुमारास मा. परिवहन मंत्री यांनी घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रवासी वाढवा योजनेची प्रभावी अमंलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिवाकर रावते (२९-०१-२०१९) :** (१) नाही.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाद्वारे प्रवासी वाढवा विशेष अभियान योजना सन २००८ पासून राबविली जात आहे.

सन २०१७ पासून प्रवासी वाढवा अभियान योजनेअंतर्गत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आगारास रु.१ लाख, सर्वोत्कृष्ट वाहकास रु.५०००/- व चालकास रु.३०००/- रोख पारितोषिक देण्यात येते. माहे डिसेंबर, २०१७ पासून राज्य परिवहन महामंडळाने विनावाहक, तसेच शटल सेवांच्या फेऱ्यामध्ये मोठया प्रमाणात वाढ केलेली असून, सन २०१६-१७ च्या तुलनेत सन २०१७-१८ मध्ये प्रवासी संख्येत व उत्पन्नात काही प्रमाणात वाढ झाली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**रायपूर कासारखेड (ता.धामनगाव रेल्वे, जि.अमरावती) येथील घरांचे आकस्मिक आगीमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई मिळण्याबाबत**

**(३६) १२९९०० (१०-१२-२०१८) प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायपूर कासारखेड (ता.धामनगाव रेल्वे, जि.अमरावती) येथे दिनांक ३ मार्च २०१८ रोजी वा त्यासुमारास आकस्मिक लागलेल्या आगीमुळे नुकसान झालेल्या घरांना NDRF च्या निकषानुसार नुकसान भरपाई मिळावी याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तहसिलदार, धामनगाव रेल्वे यांना दिनांक ३ जुलै २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आकस्मिक लागलेल्या आगीमुळे नुकसान झालेल्या घरांना व तेथील घरमालकांना अद्यापपर्यंत NDRF च्या निकषानुसार नुकसानीचे मूल्यांकन करून अद्यापपर्यंत नुकसान भरपाई मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आकस्मिक लागलेल्या आगीमुळे नुकसान झालेल्या घरांना NDRF च्या निकषानुसार नुकसान भरपाई मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१९) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) रायपूर का. (ता.धामनगाव रेल्वे, जि.अमरावती) येथे दिनांक ३ एप्रिल २०१८ रोजी लागलेल्या आकस्मिक आगीमध्ये २ लोकांचे राहते घर व ३ लोकांच्या गोठ्याला आग लागून नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. झालेल्या नुकसानीबाबत तांत्रीक अधिकारी, धामनगांव रेल्वे यांनी केलेल्या मुल्यांकनानुसार बाधितांना रु. २४,२५० इतक्या मदतीचे वाटप करण्यात आले आहे. परंतु सदर आपत्तीमध्ये बाधित झालेल्या एका व्यक्तीने रु.१२५०० एवढ्या मदतीच्या रकमेचा धनादेश स्वीकारलेला नाही.
(४) प्रश्न उद्भ्वत नाही.

---

**फागणे, बाळापूर इंदिरानगर (ता.जि.धुळे) येथे अधिकृत बस थांबा देवून येथे सर्व एसटी थांबविण्याबाबत**

**(३७) १३०४४६ (१०-१२-२०१८) श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फागणे, बाळापूर इंदिरानगर (ता.जि.धुळे) येथील अनेक विदयार्थी शहरात, शाळा व महाविदयालयांमध्ये शिक्षणासाठी प्रवास करतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याठिकाणी प्रवास करणाऱ्या विदयार्थ्यांना एसटी चालक बसमध्ये प्रवास करुन देत नसुन फागणे गावात महिन्या भरापासून एसटी थांबत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन विदयार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान लक्षात घेता फागणे येथे अधिकृत बस थांबा देवून येथे सर्व एसटी थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-०१-२०१९) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
मात्र तपासून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्भ‍ावत नाही.

---

**विदर्भातील शेतकऱ्यांना खरीपातील दुष्काळी मदत देण्याबाबत**

**(३८) १३०८२८ (१५-१२-२०१८) श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च न्यायालयाचे आदेशाने लागू करण्यात आलेली खरीप सन २०१५ ची दुष्काळी मदत विदर्भातील ११८६२ गावातील शेतकऱ्यांना राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकच्या (NDRF) सूत्रानुसार कोरडवाहू क्षेत्रासाठी रु.६८००/- व ओलिताच्या क्षेत्रासाठी रु.१३५००/- प्रमाणे वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक वाटप न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१९) :** (१), (२) व (३)

महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २९ डिसेंबर, २०१६ अन्वये खरीप २०१५ मधील औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर विभागातील कापूस तसेच अमरावती व नागपूर विभागातील सोयाबीन पिकांच्या नुकसानी संदर्भात ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेअंतर्गत पीक विमा घेतलेला आहे अशा शेतकऱ्यांना मंडळनिहाय जाहीर करण्यात आलेल्या पीक विमा योजनेंतर्गत देय नुकसानभरपाई रक्कमेच्या ५०% रक्कम पीक विमा योजनेत सहभागी नसलेल्या शेतकऱ्यांना मदत म्हणून देण्यात आली आहे. त्याकरिता अमरावती व नागपूर विभागातील शेतकऱ्यांना रू.४८९.०८ कोटी इतकी रक्कम प्रत्यक्ष वाटप करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तालुका कृषी अधिकारी, गेवराई यांच्या गैरकारभाराची चौकशी होणेबाबत**

**(३९) १३०८७२ (०६-१२-२०१८) श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.एस.एस.स्वामी, तालुका कृषी अधिकारी, गेवराई यांच्या गैरकारभाराची सखोल चौकशी होणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (गेवराई) यांनी कृषी आयुक्त, पुणे यांना दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१९) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तालुका कृषि अधिकारी, गेवराई, जि.बीड यांच्या गैरकारभाराची सखोल चौकशी करण्याबाबत तत्कालीन मंत्री (कृषि) यांना दि.१८.१२.२०१७ रोजी दिले होते. त्याअनुषंगाने कृषि आयुक्तालयातील दक्षता पथकामार्फत चौकशी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील कृषी विभागातर्फे ग्रामबीजोत्पादन कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांना महाबीजचे परमिट देण्याबाबत

**(४०) १३११२७ (०६-१२-२०१८) श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील कृषी विभागातर्फे ग्रामबीजोत्पादन कार्यक्रमांतर्गत १.६१ लाख क्विंटल सोयाबीनचे लक्ष्यांक व अनुदानावरील बियाण्यांसाठी शेतकऱ्यांना महाबीजचे परमिट देण्यात आले परंतु प्रत्यक्षात बियाणे खरेदी करण्याकरिता गेलेल्या शेतकऱ्यांना परमिटचे बियाणे मिळाले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे अनेक शेतकऱ्यांना वेळेवर परमिट मिळाले नसल्याचे व योग्य प्रमाणात परमीट बियाण्यांचा पुरवठा न झाल्याने शेतकऱ्यांना महागडे बियाणे विकत घ्यावे लागले असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, तद्नुसार अमरावती जिल्हयातील शेतकऱ्यांना महाबीजचे परमीट देण्याबाबत कार्यवाही करुन नियोजनबध्द पध्दतीने काम न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०१-२०१९) :** (१), (२) व (३) अमरावती जिल्ह्याकरीता कृषि आयुक्तालयाने निर्गमित केलेल्या ग्राम बिजोत्पादन कार्यक्रमाचे मार्गदर्शक सुचनेच्या व उपलब्ध निधीच्या अधिन राहुन सोयाबीन पीक वाणाचे एकूण १८,००० क्विंटल बियाणे ग्राम बिजोत्पादन कार्यक्रमांतर्गत अनुदानीत दराने वितरीत करण्याचे लक्षांक आवंटीत करण्यात आले होते. त्यानुसार, एकूण ३५,७४३ क्विंटल बियाणे मात्रा अमरावतीमध्ये सर्वसाधारण विपणन व ग्राम बिजोत्पादनासाठी एकत्रीतपणे पुरवठा करण्यात आली. अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना एकूण ३१,९६१ परमीट वितरीत देखील करण्यात आले होते. यापैकी, एकूण १६,२४७ परमिट विविध विक्रेत्यांकडून बियाणे घेऊन लाभार्थी शेतकऱ्यांद्वारे वटविण्यात आले. अमरावती जिल्ह्यामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले एकूण ३५,७४३ क्विंटल बियाण्यांची विक्री ग्राम बिजोत्पादन योजना, तसेच, सर्वसाधारण विपणनाद्वारे एकाचवेळी चालू होती. सदर

योजनेमध्ये एका शेतकऱ्यास जास्तीत जास्त एकच बॅग देण्याची तरतुद असल्यामुळे शेतकऱ्यांचा योजनेंतर्गत लाभ घेण्याकडे जास्त कल नसतो. त्यामुळे, सरासरी परमीट वाटप झाल्याच्या ५० टक्केच शेतकरी परमीट घेऊन दुकानांमधून बियाणे घेऊन जातात असा अनुभव आहे. एकूण १६,२४७ परमीट धारक शेतकऱ्यांनी हंगामाअंती सदर योजनेंतर्गत एकूण ४,८७४ क्विंटल बियाणे वितरीत करण्यात आले. मार्गदर्शक सुचनेनुसार प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य यानुसार विक्रेत्यांनी विक्री केलेली आहे. हंगामादरम्यान जिल्हयात बियाणे कमी पडू शकते ही शक्यता लक्षात घेता दिनांक १९.०६.२०१८ ला १७० क्विंटल व दिनांक २०.०६.२०१८ ला २६०.१० क्विंटल सोयाबीन बियाण्याचा पुरवठा करण्यात आला. तरीसुद्धा बियाण्याची उणीव भासताच दिनांक २८.०६.२०१८ ला ३० क्विंटल व ३०.०६.२०१८ ला २२.८० क्विंटल तसेच, ०४.०७.२०१८ ला ११.४० क्विंटल बियाण्याची इतर जिल्हयातुन अमरावती जिल्हयात पुरवठा करण्यात आला, वरील बाबींचा विचार करता असे निदर्शनास येते की, वेळोवेळी अमरावती जिल्हयात सोयाबीन बियाण्यांचा पुरवठा करण्यात आला असल्यामुळे,परमीट घेऊन विक्रेत्यांकडे आलेले बहुतांश शेतकरी हे बियाण्यांपासून वंचीत राहिलेले नाहीत.

(४)प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील पावसामुळे पिकांचे होणारे नुकसान टाळण्याकरिता अतिवृष्टीने बाधीत होणाऱ्या क्षेत्राचा उच्चस्तरीय समिती नेमूण सर्वेक्षण करण्याच्या मागणीबाबत**

**(४१) १३११७१ (०६-१२-२०१८) श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी, भुदरगड, आजरा, गगनबावडा, चंदगड व शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यांमध्ये सरासरी ४ हजार ५०० ते ५ हजार ५०० मि.मी.पावसाची नोंद होत असून दरवर्षी पिकांचे होणारे नुकसान टाळण्याकरिता अतिवृष्टीने बाधीत होणाऱ्या क्षेत्राचा उच्चस्तरीय समिती नेमून सर्वेक्षण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राधानगरी तालुक्यातील दाजीपूर, हसणे, डिगस, कारीवडे तसेच भुदरगड तालुक्यातील कडगाव-पाटगाव परिसर व आजरा तालुक्यातील किटवडे, अंबार्डे, शेळप, घाटकरवाडी परिसरामध्ये ६ हजार ५०० ते ७ हजार ५०० मि.मी. पावसाची नोंद दरवर्षी होत असल्यामुळे वर्षानुवर्षे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,त्याची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०१-२०१९) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. सन २०१३ ते २०१८ पर्यंतच्या पावसाची तालुकानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | तालुका | सरासरी पाऊस | प्रत्यक्ष पडलेला पाऊस | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सन २०१३ | सन २०१४ | सन २०१५ | सन २०१६ | सन २०१७ | सन २०१८ |
| १ | राधानगरी | ३५०१.६ | १९२०.३ | १६५५.१ | ८५५.२ | १६८३.४ | १६८५.२ | २१४४.६ |
| २ | भुदरगड | १३४३.७ | १७३४.६ | १४७२. | ८६७.४ | १३०३.५ | १२४१.६ | १७५० |
| ३ | आजरा | १७८०.४ | १८५४.१ | १५२८.७ | ७९५.६ | १६८०.९ | १४१०.८ | १७३४.१ |
| ४ | गगनबावडा | ५६२९.४ | ५७३७.५ | ४७०८.६ | २५७५.७ | ३७४१.५ | ३०६५ | ३८७३ |
| ५ | चंदगड | २६०९ | १८७७ | १७५७ | १०७६ | १६६२.३ | १६११.४ | २१४०.५ |
| ६ | शाहुवाडी | १५४२.३ | २३५५.२ | २२९८.१ | १०५२.७ | २११५.१ | १७०९.९ | २४६८.२ |

(३) नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे केलेले असून, पिकनिहाय नुकसानग्रस्त क्षेत्राचा संयुक्त स्वाक्षरीचा अहवाल शासनास सादर केलेला आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यात जादा बसगाडयांची सोय करण्याबाबत**

**(४२) १३१६७३ (११-१२-२०१८) श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात सन २०१६-१७ व २०१७-२०१८ या कालावधीत एस.टी. प्रवाशांची वाहतूक किती प्रमाणात वाढली आहे,
(२) असल्यास, प्रवाशांच्या वाहतुकीतील वाढीप्रमाणे बस गाड्यात वाढ झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पालघर जिल्ह्यातील प्रवाशांच्या वाहतुक वाढीच्या अनुषंगाने जादा बसगाड्यांची सोय करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-०१-२०१९) :** (१), (२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या पालघर विभागाद्वारे सन २०१५-१६ या वर्षात ६८३.१३ लाख एवढया प्रवाशांची वाहतूक करण्यात आली असून, सन २०१६-१७ मध्ये ६५१.४९ लाख एवढया प्रवाशांची वाहतूक करण्यात आली. तसेच सन २०१७-१८ मध्ये ६१२.९५ लाख एवढया प्रवाशांची वाहतूक करण्यात आली. म्हणजेच सन २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१७-१८ या वर्षात प्रवासी संख्येत ७०.१८ लाखाने घट झाली आहे.

प्रवाशी वाहतूकीसाठी पुरेशा बस उपलब्ध आहेत. तथापि, प्रवाशांच्या मागणीनुसार तपासणीअंती आवश्यक तेथे बससेवा पुरविण्यात येत आहे.

---

**मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील अनेक पदे रिक्त असल्याबाबत.**

**(४३) १३१६८४ (११-१२-२०१८) श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई):** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील अनेक पदे रिक्त असल्यामुळे जनावरांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असुन उपलब्ध डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण येत असल्याने पंचायत समितीमार्फत जिल्हास्तरावर रिक्त पदांसाठी सातत्याने पाठपुरावर करुनही रिक्त पदे भरली गेली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मोखाडा तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१७-०१-२०१९) :** (१) व (२) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात पशुधन विकास अधिकारी यांची ४ पदे मंजूर असून ३ पदे भरलेली व १ पद रिक्त आहे. सहाय्यक पशुधन विकास अधिकारी गट-क यांचे १ पद मंजूर असून ते भरलेले आहे. तसेच पशुधन पर्यवेक्षकांची ४ पदे मंजूर असून ३ भरलेली व १ रिक्त आहे. सदर रिक्त पदांचा अतिरिक्त नजीकच्या पशुवैदयकीय अधिकारी व कर्मचारी यांचेकडे सोपवून सर्व पशुपालकांना नियमित पशुवैदयकीय सेवा सुविधा पुरविण्यात येत आहेत. तसेच जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही व कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण येत असल्याचे दिसून येत नाही.

भविष्यात सरळसेवा व पदोन्नतीच्या मार्गाने पशुधन विकास अधिकारी या पदाची पदभरती करतांना मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील वरील प्रमाणे रिक्त असलेली पदे भरण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच पशुधन पर्यवेक्षकांची ही पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, पालघर मार्फत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**मौजे कोर्टा (ता.वसमत, जि.हिंगोली) येथे एन्ट्रोटॉक्झिमिया या रोगामुळे मेंढयांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(४४) १३१९६१ (०७-१२-२०१८) श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोर्टा (ता.वसमत, जि.हिंगोली) येथे एन्ट्रोटॉक्झिमिया या रोगामुळे सुमारे १२५ मेंढयांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रोगावर अजून कुठलेही संशोधन न झाल्यामुळे निश्चितपणे औषधोपचारावर प्रगती नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसान झालेल्या मेंढपाळांना आर्थिक मदत देण्यासह रोगावर नियत्रंण राखणे व औषधोपचारावर संशोधन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१७-०१-२०१९) :** (१) हिंगोली जिल्ह्यातील मौजे कोर्टा ता.बसमत, येथे एन्ट्रोटॉक्झीमिया या रोगामुळे १२० मेंढ्यांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.शेळ्या व मेंढ्या यांना एन्टेरोटॉक्झेमिया (आंत्रविषार) या रोगापासून संरक्षणासाठी रोग प्रतिबंधात्मक लस उपलब्ध असून लसीकरणाद्वारे तसेच औषधोपचाराद्वारे रोग प्रादुर्भाव आटोक्यात आणणे शक्य आहे.
(३) (१) सदर प्रकरणी चौकशी केली असून मौजे कोर्टा ता.बसमत,जि.हिंगोली येथील ५ मेंढपाळांच्या मालकीच्या एकूण ५३० मेंढ्या दिनांक १०.९.२०१८ रोजी मोजे शेंदूरसना, ता. औढा, जि.हिंगोली येथील परिसरात चरत असतांना अचानक मरतुक सुरू झाल्याची माहिती मेंढपाळाने पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ वाई, ता.वसमत येथे दिली. त्यानुसार पशुसंवर्धन विभागाच्या पथकाने घटनास्थळी तात्काळ भेट देऊन आजारी मेंढ्यांची तपासणी व औषधोपचार केले व मृत मेंढ्यांचे शव विच्छेदन करून व रोग लक्षणे यावरून एन्टेरोटॉक्झेमिया (आंत्रविषार) या रोगाचे प्राथमिक निदान करून औषधोपचार सुरू केले असल्याचे आढळून आले आहे.
(२) दिनांक ११.९.२०१८ रोजी जिल्हातील पशुसंवर्धन विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी पथकासह भेट दिली आहे.सबंधित मेंढपाळांना आजाराबाबत योग्य ते मार्गदर्शन करून वसमत व औंढा तालुक्यातील पशुसंवर्धन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाची स्थापना करून रोग आटोक्यात येईपर्यंत दैनंदिन संनियंत्रण केले.
(३) पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी व रोग अन्वेषण विभाग, पुणे यांनी सदर रोगाचे निदान एन्टेरोटॉक्झेमिया (आंत्रविषार) असे केले आहे.
(४) सदरील मेंढपाळांनी यापूर्वी करण न केल्यामुळे या रोगाची लागण होऊन एकूण ५३० मेंढ्यांपैकी १२० मेंढ्या मृत पावल्या आहेत. उर्वरित ४१० मेंढ्यांना आवश्यकते उपचार व ३८२ मेंढ्यांना आंत्रविषार या रोगाचे लसीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे ४१० मेंढ्यांची मरतूक थांबली आहे.
(५) सदरील मरतूक ही संसर्गजन्य जिवाणू रोगामुळे झाल्याने विहीत निकषानुसार आर्थिक मदत अनुज्ञेय होत नाही.
(४) प्रश्न उद्भ्ावत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांवर जेनेरिक औषध दुकाने सुरु करण्याबाबत**

**(४५) १३३४९५ (११-१२-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या स्थानकांत स्वस्त दरात जेनेरिक औषध दुकान सुरु करण्याबाबत ६ निविदाकारांनी तयारी दाखविल्यामुळे राज्यातील एसटी स्थानकात माफक दरात औषधे मिळणार असल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या स्थानकांत स्वस्त दरात जेनेरिक औषध दुकान सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-०१-२०१९) :** (१) व (२) राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांवर जेनेरिक औषधालय सुरु करण्याकरिता महामंडळाद्वारे दि.०७.०७.२०१८ रोजी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा प्रक्रिया पूर्ण करुन निविदाकाराची निवड करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरखेड (जि.यवतमाळ) विधानसभा मतदार क्षेत्रातील पळशी, देवसरी, चातारी, संगमचिंचोली या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(४६) १३३५४१ (१०-१२-२०१८) श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) विधानसभा मतदार संघातील पळशी, देवसरी, चातारी, संगमचिंचोली या गावांचे पुनर्वसन करण्याकरिता विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पळशी या गावाचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर करण्यात येत आहे. सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर त्याची तपासणी करुन, उचित निर्णय घेण्यात येईल. देवसरी व चिंचोली (संगम) या पुरग्रस्त गावांचे पुनर्वसन करण्याचा विभागीय आयुक्त, अमरावती यांनी शासनास पाठविलेला प्रस्ताव पुरपुनर्वसन धोरणानुसार नसल्याने सदर प्रस्ताव शासनाने अमान्य केला आहे. चातारी हे गाव पुरग्रस्त नसल्याने पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही, असे जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या कार्यालयाने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत लातूर जिल्हयात विमा कंपनीचे कार्यालय नसल्याबाबत**

**(४७) १३३६७३ (०७-१२-२०१८) श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप सन २०१८ मध्ये निवडलेल्या विमा कंपनीचे कार्यालय नसल्यामुळे शेतकऱ्यांना वैयक्तिक व इतर अर्ज दाखल करणे, विमा प्रक्रियासंदर्भातील माहितीची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले असून त्याबाबत जिल्हाधिकारी,कृषी अधिकारी व महसूल विभागास माहे ऑक्टोंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले व चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, तद्नुसार प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत लातूर जिल्हयात विमा कंपनीचे कार्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०१८ मध्ये लातूर जिल्हयात भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत राबविण्यात आली. सदर कंपनीचे जिल्हा व्यवस्थापक, तसेच विभागीय व्यवस्थाक यांना विमा कंपनीचे कार्यालय सुरु करणेबाबत तसेच जिल्हा व तालुकास्तरावरील जन सुविधा केंद्रावरील सुविधांचा वापर प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये अर्ज स्विकारण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जागृती करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार भारतीय कृषि विमा कंपनीने खरीप हंगाम २०१८ मध्ये लातूर जिल्हयासाठी १ जिल्हा समन्वयक व सर्व १० तालुक्यांसाठी १३ तालुका प्रतिनिधींची नेमणूक केली आहे. सदर प्रतिनिधींना जिल्हा व तालुकास्तरावर कृषि विभागाच्या कार्यालयामध्ये उपस्थित राहून शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्याच्या सूचना जिल्हास्तरीय समितीने सभेमध्ये दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भावत नाही.

---

**रावेर व यावल (जि.जळगांव) तालुक्यातील कृषी यांत्रिकीकरण योजनेतील अनुदान मिळण्याबाबत**

**(४८) १३३९१९ (०७-१२-२०१८) श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर व यावल (जि.जळगांव) तालुक्यातील कृषी यांत्रिकीकरण योजनेत ट्रक्टर अनुदानासाठी अर्ज केलेल्या अंदाजे १००० शेतकऱ्यांना अद्यापही पूर्व संमती मिळालेली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कृषी विकास दर गाठण्यासाठी सदरील शेतकऱ्यांना अनुदान मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०१-२०१९) :** (१) व (२) केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी त्या- त्या आर्थिक वर्षात उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत करणे क्रमप्राप्त आहे. सन २०१८-१९ या वर्षात रावेर व यावल तालुक्यासाठी ट्रॅक्टरसाठी अनुक्रमे रु.६ लाख व रु.६.५० लाखाचे लक्षांक देण्यात आले आहे. सदर निधीच्या मर्यादेत रावेर व यावल तालुक्यामध्ये अनुक्रमे ११ व ९ शेतकऱ्यांना पुर्वसंमती देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भ‍ावत नाही.

---

**मुर्तिजापूर (जि.अकोला) आगारातील असभ्य वर्तन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्याबाबत**

**(४९) १३४१९४ (११-१२-२०१८) श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुर्तिजापूर (जि.अकोला) आगारातील चालक श्री.शकीलखान व आर.के.वरघट यांनी इतर कर्मचारी व महिला कर्मचाऱ्यासोबत केलेल्या असभ्य वर्तनाबाबत त्यांच्यावर कार्यवाही करण्याबाबतची तक्रार विभाग नियत्रंक, राज्य परिवहन महामंडळ, अकोला यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन असभ्य वर्तन करणाऱ्या वाहनचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी राज्य परिवहन महामंडळाद्वारे चौकशी करुन श्री.शकिलखान रद्देमखान व श्री.आर.के.वरघट या चालकांना निलंबित करण्यात आलेले होते. सद्यस्थितीत सदर चालकांचे निलंबन उठविण्यात आलेले असून, राज्य परिवहन महामंडळाच्या दि.२८.११.२०१८ च्या आदेशांन्वये त्यांची मुर्तिजापूर आगारातून रिसोड आगारात बदली करण्यात आली आहे व त्यांच्यावरील आरोपपत्रांबाबत महामंडळाच्या नियमाप्रमाणे कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भ‍ावत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयामध्ये कृषी निविष्ठा एम.एस.एस.आय.डी.सी. यांच्याकडून खरेदी न करता इतर पुरवठादाराकडून खरेदी केल्याबाबत**

**(५०) १३४२२९ (०७-१२-२०१८) श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयामध्ये कृषी विभागाकडून दिनांक १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१८ या कालावधीत कृषी निविष्ठा हया एम.एस.एस.आय.डी.सी. यांच्या व्यतिरीक्त इतर पुरवठादारांकडून खरेदी करून आर्थिक अनियमितता करण्यात आल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम.एस.एस.आय.डी.सी. यांच्याकडून कृषी निविष्ठा खरेदी न करता इतर पुरवठादारांकडून खरेदी करण्यामागील कारणे काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) सन २०१६-१७ पर्यंत महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ ही शासकीय पुरवठादार संस्था होती. सन २०१७-२०१८ पासून DBT तत्वावर शेतकऱ्यांकडून खुल्या बाजारातुन खरेदी केली जाते.

(३) व (४) प्रश्न उद्भ‌ावत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.